1.

फि.फौ.ख. क्र. 139/16
निशाणी क्र. 17

सरकारतर्फे साक्षीदार क्र. 2 यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नाव – भीमराव नवनाथ अनारसे
वय 54 वर्षे, व्यवसाय – पोलीस हेडकॉन्स्टेबल
राहणार – पो. स्टे. राहता

सरतपास सरकारतर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती ए. एस. महाले यांचे मार्फत –

मी सन 2014 ते 2019 या काळात पो. स्टे. लोणी येथे एमएच 16 एन 643 या सरकारी वाहनावर चालक म्हणून कार्यरत होतो. दि. 16/6/2016 रोजी रात्री 10 ते 17/6/2016 चे पहाटे पाच वाजेपर्यंत मी गस्तीचे कर्तव्यावर होतो. याविषयी वाहनामध्ये मी, स.पो. नि. पवार, पोहेकॉ. घागरे, असे आम्ही शिर्डी विभागात नेमून दिलेले विभागीय गस्तीवर होतो. याविषयी विभागीय कोपरगाव, शिर्डी, राहता अशी विभागीय गस्त करून आम्ही 3.15 वाजता कोल्हार येथे आलो. त्यावेळी सपोनि श्री पवार यांना गुप्त माहिती मिळाली की पायरे गावचे शिवारात प्रवरा नदीपात्रात एक मालट्रक टिप्परवाला वाळू भरून घेऊन जात आहे. सदर माहितीचे अनुषंगाने सपोनि श्री पवार, मी, पोहेकॉ घागरे, कोल्हार दुरक्षेत्र

(सही) 21/8/24

पोहेकॉ उजागरे, पोलीस नाईक अर्पीता
बोलावून बातमीची हकीकत सांगून सरकारी
जीपने कोल्हार येथून आम्ही ३.२५ चे
सुमारास पायरी पु. प्रवरा नदीपात्राचे
ठिकाणी गेलो, तेथे एक मालट्रक निळ्या
रंगाचा MH19 Z 1349 पिकून आला,
सदर ट्रकचे चालकास थांबण्याचा इशारा
केला असता तो ट्रक सोडून पळून गेला
व पाठलाग केला परंतु मिळून आला नाही.
सदर ट्रकची पाहणी केली असता ट्रकमध्ये
अंदाजे ~~साडेब्रास~~ साडेतीन ब्रास वाळू मिळून
आली, सदरचा ट्रक पोलीस स्टेशनला
नेण्यात आला व पुढील वाहनाचा
पंचनामा ~~श्री~~ पोहेकॉ श्री घागरे यांनी
केली, त्यानंतर शासनाचे वतीने मी
आरोपीविरुद्ध फिर्याद दिली.
आता मला फिर्याद वाचून दाखविण्यात
आली, त्यावर माझी सही आहे त्यातील
मजकूर सत्य व बरोबर आहे. फिर्याद
व पुरवणी जबाब दि. 18/7/19 देण्यात
आला. तपासादरम्यान आरोपी आढळून
आला व त्याचे नाव अमोल रमेश दुथिंग
असल्याचे कळाले.
उत्तरंनपाल आरोपी रिहीत
व्ही. बी. पवार.

2/8/18

) ~~शिर्डी~~ घटनेच्या वेळी ११.२५ ला लोणीवरुन निघून कोपरगाव येथे गेलो, रात्री १२च्चे सुमारास कोपरगाव येथे जेल, पोलीस स्टेशन येथे गेलो. याठिकाणी नोंदी केल्या, कोपरगाव हून शिर्डी व शिर्डीवरुन राहता येथे आलो. राहता येथे रात्री २च्चे सुमारास व त्यानंतर कोल्हार येथे आलो, सरकारी वाहनाचे नोंदी साठी स्वतंत्र पुस्तक असते, घटनेचे वेळचे सरकारी वाहनाचे रजिस्टर त्याची प्रमाणित प्रत सादर करु शकतो, तपासिक अंमलदार यांनी माझे वाहनाचे रजिस्टरचे मागणी माझेकडे केली नाही, हे म्हणणे खरे नाही की घटनेचे दिवशीच्या नोंदी रजिस्टर मध्ये नमुद नाही.

) मुळात माहीती मिळाली त्यावेळी आमचे वाहन कोल्हार कुरणात येथे होते; साहेबांनी आम्हाला कुरणात माहीती दिली, साधारणतः त्यावेळी अर्धा ते १ तास गेला, कोल्हार ते पाथरी जाण्यासाठी अर्धा तास लागतो, मालट्रक मधील ~~बाहून~~ मालाचा नमुना घेतला नाही, मालट्रक नदीपात्रातून पोलीस स्टेशन पर्यंत मी चालवित नेला, त्यावेळी सरकारी वाहन सपोनि पगारे यांनी चालविले,

२/४/१६

) माहेशंमध्ये मालट्रक चे मोजमाप आले नाही.
ट्रक पोलिस स्टेशन प्रांगणात उलट बाजूला
लावला, यावेळी वाहनाचे बोर्ड उतरेला
होता, नदीपात्रात वाहनाच्या पंचनामा
केला नाही अथवा वाळू काढलेले नदीपात्राच्या
पंचनामा केला नाही. हे म्हणणे खरे नाही
की ट्रक पोलीस स्टेशनला सकाळी ८ वाजता
आणला, हे म्हणणे खरे नाही की
ट्रकमध्ये वाळू नव्हती, हे म्हणणे खरे
नाही. घटनेचे दिवशी शिमगिस गस्त
अवल्याने व त्यादिवशी कोपरगाव, शिर्डी
राहता, केसार कुरुक्षेत्र येथे गेल्याचे खोटे
सांगतो, हे म्हणणे खरे नाही की
घटनेचे दिवशी मुक्त मिळाली व
याअनुषंगाने प्रवरा नदी पात्रात छापा
टाकला आणि आरोपीच्या ट्रक पकडला असे
खोटे सांगतो. हे म्हणणे खरे नाही
की सरकारी वाहनाचे लाईटचे उजेडात
ट्रकचा क्रमांक आम्हाला दिसला असे मी
खोटे सांगतो, हे म्हणणे खरे नाही की
ट्रकचालकास थांबण्याचा इशारा केला असता
ट्रकचालक पळून गेला असे खोटे सांगतो,
हे म्हणणे खरे नाही की छाप्यात ट्रकमध्ये
साडेतीन ब्रास वाळू मिळाली असे खोटे सांगतो.
हे म्हणणे खरे नाही आरोपीचे नाव
कळाले असे खोटे सांगतो, हे म्हणणे

चा/८/०६

खरे आहे की फिर्यादि फिर्यादीनंतर मासे
कर्णिक संपले व यानंतर २५ लोकांचे
स्नुनीनंतर मी ड्युटीवर आलो. हे म्हणणे
खरे नाही की त्याचे फिर्याद देऊन
खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.
फेरतपास नाही.

दि. ५।४।२८

५।४।२८
बी. आर. कुलारी
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी
राधवा,